शिकारी आणि त्याचा कुत्रा

लेखक : ब्रायन



शिकारी आणि त्याचा कुत्रा

मराठी : अर्चना कुलकर्णी

एके दिवशी, गावाबाहेर खूप
आत शेतात एका कुत्रीने तीन
पिल्लांना जन्म दिला.

शिकारी एकदा शेतात गेला असताना
तो त्यातल्या तिना पैकी एका पिल्लाला
घरी घेऊन आला. त्याला त्या पिल्लाला
शिकून शिकारी कुत्रा बनवायचे होते.



काही दिवसाने त्या पिल्लाचा एकमोठा कुत्रा झाला
तेंव्हा त्याला नवीन-नवीन युक्त्या शिकवायचं ठरवलं.

शिकारी काठी फेकायचा आणि
कुत्र्याला ती स्वतः कडे आणायला सांगायचा.

नंतर त्याने अंडी न फोडता तोंडात धरून
कशी आणायची ते शिकवलं.

“सून” शिकारी त्याला हाक मारित असे. लवकरचं तू
माझ्याबरोबर शिकारीला येण्यास योग्य होशील.



एके दिवशी दोघे
पहाटेच शिकारीला
बाहेर पडले.
बांबूच्या वनात ते
बराच वेळ लपून वाट
पहात होते.

अचानक एक बदक
उडत आलं त्याला
बघून शिकार्याने
बंदूक उचलली आणि
ढिश्याव करून
बदकाला गोळी
मारली. बदक जखमी
होऊन खाली पडलं.

कुत्रा जेंव्हा बदकाला आणायला गेला त्याने जेंव्हा बदका
ला जखमी हताश जमिनीवर पडलेलं बघितलं तेंव्हा
त्याला खूप वाईट वाटलं. अलगदपणे त्याने बदकाला
तोंडात धरलं आणि एक बेटावर घेऊन गेला.





कुत्र्याने त्या बदकाची जखम चाटली जणु काही त्यातून तो बदकाला सांगत होता. तु काळजी करू नकोस मी तुझी काळजी घेईन. त्याने तीच चाल शिकऱ्याशी खेळायची ठरवली.

“मला शिकवलं काठी परत कशी आणायची,” तो स्वतःशीच म्हणाला, त्या प्रमाणे त्याने बदकाला तिथेच ठेवलं आणि काठी घेऊन तो शिकार्यापाशी पोचला.

परत ते शिकारीला निघाले जेंव्हा जेंव्हा शिकारी बदकाला
गोळी मारायचा कुत्रा त्याच्या मागे जायचा

आणि त्या बदकाला बेटावर सोडून
काठी घेऊन शिकार्यापाशी यायचा.



रोज रात्री कुत्रा शिकर्यांच्या घरातून ब्रेड चोरायचा,

आणि त्या बदकांना नेऊन द्यायचा.

एके दिवशी शिकऱ्याने कुत्र्याला
ब्रेड चोरून घेऊन जाताना पाहिलं,
त्याने कुत्र्याचा पाठलाग केला.

बांबूच्या वनात खूप
आत गेल्यावर
त्याने पाहिले कुत्रा
बदकांना ब्रेड भरवत
आहे. त्याला
आपल्या कृत्याची
लाज वाटली.

सकाळी त्याने एक पिंजरा आणला आणि
हळुवारपणे त्या बदकांना त्या पिंजऱ्यात ठेवले,

आणि आपल्या घरी घेऊन आला.

त्याने बदकांच्या जखमा धुतल्या

त्यांना बँडेज केलं हळू हळू त्यांना बरं वाटलं.



जेंव्हा बदकं पूर्ण बरी झाली एका सकाळी शिकार्याने बदकांना त्याच जागी नेऊन ठेवले ज्याजागी त्यांना त्याने मारले होते.

एक एक करून त्या बदकांना त्याने आकाशात सूर्यप्रकाशात भरारी घ्यायला सोडले.

“आपल्या मालकाला पक्षी आणून देणाऱ्या कुत्र्याच्या लक्षात आले कि आपण ह्या कामासाठी योग्य नाही फारच दयाळु आहोत.”

ब्रायन वाईल्डस्मिथ यांनी शिकारी आणि त्याचा कुत्रा ही गोष्ट अत्यंत परिणामकारक रित्या मांडलेली आहे.